**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET


Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२६ ■ शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -326 ■ Friday, 28 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## मंत्रालयात ऑनलाईन ॲपद्वारे मिळणार प्रवेश

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मंत्रालय सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली. तसेच टप्पा २ अंतर्गत प्रवेशासाठी व्हीजीटर मॅनेजमेंट सिस्टीम प्रणाली



विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, अभ्यागत यांना यापुढे कोणत्याही कामाकरीता प्रवेश हवा असल्यास त्यांना 'डिजीप्रवेश' या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे.

अभ्यांगतांना मंत्रालयाच्या ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि अनुज्ञेय असलेल्या मजल्यावरच प्रवेश करावा. अनधिकृत मजल्यावर प्रवेश केल्यास अभ्यागत कारवाईस पात्र राहतील. अभ्यागतांनी संबंधित विभागातील आपले काम पूर्ण झाल्यावर विहीत वेळेत मंत्रालयातून बाहेर पडावे.


### अभ्यागतांनी अशी करावी नोंदणी

'डिजीप्रवेश' ॲप हे मोबाईल ॲप ॲण्ड्राईड आणि आयओएस ॲपल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाईल च्या प्रणालीनुसार ॲण्ड्राईडमध्ये प्ले स्टोअर वर तर आयओएस ॲपलवर ॲपल स्टोअरवर वळसळ ीिींशीह हे सर्च केल्यास हे ॲप विनामुल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरूवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारीत यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश घेता येईल. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनीटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग अभ्यागतांना रांगेत उभे राहण्यामुळे होणारा त्रास विचारात घेता त्यांना दुपारी १२ वाजता प्रवेश देण्यात येईल. तर दुपारी १२ नंतर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांचेसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था राहील. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांनी तत्संबंधीचे वैध प्रमाणपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना दुपारी २ वाजेनंतर प्रवेश देण्यात येईल. अशा प्रवेशासाठी त्यांना डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळिवता येईल. अभ्यागतांनी मंत्रालयात प्रवेश मिळिवण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे.

'डिजीप्रवेश' ॲपद्वारे आपली नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यू आर कोड आधारे मंत्रालयाबाहेर असलेल्या खिडकीवर मंत्रालय प्रवेशाकरिता आरएफआयडी कार्ड वितरीत करण्यात येईल. हे आरएफआयडी कार्ड आधारे सुरक्षाविषयक तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येईल. अभ्यागतांना आरएफआयडी प्रवेश ओळखपत्र परिधान करणे व मंत्रालयातून बाहेर जाताना ते सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक राहील.

## भारतात साकारतोय आशिया खंडातील सर्वाधिक लांबीचा 'झोजिला' बोगदा



**१३** किलो मीटर लांबीच्या झोजिला बोगद्याचे काम सुरू आहे

**५५००** कोटी रुपयांमध्ये बोगदा आता पूर्ण केला जाणार आहे.

**७०** टक्के काम पूर्ण झाले आहे. २०२६ पर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**२०१८** मध्ये या बोगद्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पायाभरणी केली

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुमारे सुमारे १३ किलोमीटर लांबीच्या झोजिला बोगद्याचे काम सुरू आहे. हा बोगदा आशिया खंडातील सर्वाधिक लांबीचा बोगदा असणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत ही माहिती दिली.

हिवाळ्यात बर्फवृष्टीमुळे लडाखचा उर्वरित भारताशी संपर्क तुटू नये म्हणून हा बोगदा महत्त्वाचा ठरणार आहे. या बोगद्याचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. २०२६ पर्यंत हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. शून्याखाली तापमान येणाऱ्या भागात हा बोगदा उभारला जात आहे.

लडाख, जम्मू आणि काश्मीर येथे हिवाळ्यात बर्फवृष्टी होत असते. बर्फवृष्टीमुळे अनेकदा या भागाचा उर्वरित देशाशी संपर्क तुटतो. त्यामुळेच लडाखला देशाच्या इतर भागांशी सर्व ऋतूंमध्ये जोडणारा हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. बोगदा आता केवळ ५५०० कोटी रुपयांमध्ये पूर्ण केला जाणार आहे.

**३ तासांचा प्रवास २० मिनिटांत**

गडकरी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही या अत्याधुनिक प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी आमंत्रित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१८ मध्ये या बोगद्याची पायाभरणी केली होती. ७.५७ मीटर उंचीचा हा घोड्याच्या नालाच्या आकाराचा, दोन-लेन असलेला सिंगल-ट्यूब बोगदा आहे. तो हिमालयात झोजिला खिंडीखाली काश्मीरमधील गांदरबल आणि लडाखमधील द्रास (कारगील) जिल्ह्याला जोडेल. सध्या झोजिला खिंड पार करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात, मात्र हा बोगदा पूर्ण झाल्यावर प्रवासाचा वेळ फक्त २० मिनिटांवर येईल. गडकरी म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये दोन लाख कोटी रुपयांची रस्त्यांची कामे सुरू आहेत. तसेच १०५ बोगद्यांचे बांधकाम सुरू आहे, ज्यामुळे प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

## एसटीकडून उन्हाळी गर्दीच्या हंगामासाठी जादा वाहतूक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उन्हाळ्याच्या सुट्टींमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे जादा वाहतूक करण्यात येणार आहे. यंदा देखील उन्हाळी जादा वाहतूकीसाठी दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून या सर्व फेऱ्या आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

दर वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत दिनांक १५ एप्रिल,२०२५ ते दिनांक १५ जून,२०२५ पर्यंत एसटी मार्फत नियोजित फेऱ्या व्यतिरिक्त जादा वाहतूक केली जाते. स्थानिक पातळीवर शटल सेवा आणि जवळच्या फेऱ्या संबंधित आगारातून चालवल्या जातात. परंतु उन्हाळी सुट्टीमुळे परगावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी लांब पल्ल्याच्या बसेस ची मागणी वाढते. त्यासाठी या काळामध्ये शालेय फेऱ्या रद्द करून , त्या ऐवजी लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू केल्या जातात.

उन्हाळी हंगाम कालावधीत विभागांकडून प्रवाशी गर्दी होणाऱ्या मार्गावर दि.१५ एप्रिल,२०२५ पासून जादा फेऱ्या टप्याटप्याने सुरु करण्यात येणार आहेत. उन्हाळी हंगामासाठी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयमार्फत राज्यातील विविध मार्गावरील ७६४ जादा फेऱ्यांना मंजूरी देण्यात आली असून, या जादा फेऱ्यांव्दारे दैनंदिन ५२१ नियतांव्दारे २.५० लाख किमी चालविण्यात येणार आहे.

उन्हाळी जादा फेऱ्या संगणकीय आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तरी, प्रवाशांच्या सोयीसाठी रा.प.महामंडळाच्या अधिकृत वेबसाईट *ु.ीीिंल. ारहरीरीहींीर.र्सीं.ळप* वर तसेच *पींीलश्रळल.ीीिंर्लीीं.लो* या सकेतस्थळावर व मोबाईल ॲपव्दारे या बरोबरच रा.प.महामंडळाच्या बसस्थानकांवरील आरक्षण केंद्रावर आगाऊ आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी प्रवाशांना उन्हाळ्याच्या सुट्टीतील प्रवासाचे नियोजन करून महामंडळाच्या मार्फत जादा वाहतूक सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन रा.प.महामंडळाव्दारे करण्यात येत आहे.

## लोकसभेत स्थलांतर सुधारणा विधेयक संमत

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी लोकसभेत इमिग्रेशन सुधारणा विधेयक सादर केले. या विधेयकानुसार भारतात येणाऱ्या प्रत्येक परदेशी प्रवाशांचे एक खाते तयार होणार आहे, याद्वारे त्या लोकांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवले जाणार आहे.

स्थलांतर हा एक वेगळा मुद्दा नाही. देशातील अनेक प्रश्न त्याच्याशी जोडलेले आहेत. आपल्या देशाच्या हद्दीत कोण येते? ते कधी येते? ते किती काळासाठी येते? आणि ते कोणत्या उद्देशाने येते? देशाच्या सुरक्षेसाठी हे जाणून घेण्याचा अधिकार खूप महत्त्वाचा आहे, असे सांगत देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत स्थलांतर सुधारणा विधेयक सादर केले, ते संमतही करण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा (आळीं डहरह) यांनी गुरुवारी लोकसभेत इमिग्रेशन सुधारणा विधेयक सादर केले. या विधेयकानुसार भारतात येणाऱ्या प्रत्येक परदेशी प्रवाशाचे एक खाते तयार होणार आहे, याद्वारे त्या लोकांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवले जाणार आहे. यामुळे भारतात येणाऱ्या लोकांचा डेटाबेस आपोआप तयार होणार आहे.

इमिग्रेशन आणि परदेशी लोकांबाबतचे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरील चर्चेला उत्तर दिल्यानंतर, विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सभागृह तहकूब करण्याची घोषणा केली.

घुसखोरीसाठी आलेल्यांवर कडक कारवाई - स्वातंत्र्याच्या वेळी देशाची फाळणी घाईघाईत झाली आणि हिंदू आणि शिखांनी भरलेल्या गाड्यांची कत्तल करण्यात आली. तेव्हा नेहरूजी आणि गांधीजींनी सांगितले होते की तुम्ही तिथेच राहा. जेव्हा ते येतील तेव्हा त्यांना भारताचे नागरिक मानले जाईल.

ङ्कजे लोक येथे आपला धर्म आणि कुटुंब वाचवण्यासाठी आले आहेत ते खरे निर्वासित आहेत. हिंदू, शीख, बौद्ध, जैन, कोणीही भारतात येऊ शकतो. तुमचे स्वागत आहे. घुसखोरी करण्यासाठी आलेल्यांवर आम्ही कडक कारवाई करू. फाळणीचे भयानक परिणाम सहन करणाऱ्यांनाच आम्ही नागरिकत्व देऊ, असे शहा यांनी म्हटले.

## गुलदार युद्धनौका कुणकेश्वर समुद्रात स्थापित करण्याच्या हालचाली

मालवण : निवती रॉक समुद्रात पर्यटनासाठी स्थापित करण्यात येणारी गुलदार युद्धनौका कुणकेश्वराच्या समुद्रात स्थापित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असल्याची माहिती सूत्रांकडून समजली आहे. दरम्यान, गेली सात वर्ष वाट पाहत असलेल्या वेंगुर्ला आणि मालवण येथील पर्यटन व्यावसायिकांच्या तोंडाला पाने पुसण्याचा हा प्रकार असल्याच्या प्रतिक्रिया येथील पर्यटन व्यावसायिकांमधून उमटू लागल्या आहेत.

मालवण आणि वेंगुर्ला परिसरात भोगवे, निवती, देवबाग, तारकर्ली, मालवण, तोंडवळी या भागात मोठ्या प्रमाणावर पर्यटनवाढीस वाव आहे. या भागातील पर्यटनाला जागतिक दर्जा मिळावा यासाठी येथे एखादा नावीन्य पूर्ण प्रकल्प उभारण्यात यावा, अशी येथील पर्यटन व्यावसायिकांची मागील १०-१२ वर्षांपासूनची मागणी होती.

याच मागणीचा विचार करता निवती रॉक समुद्रात नौदलाची निवृत्त युद्धनौका स्थापित करून तिथे पाणबुडी प्रकल्प राबविण्याची संकल्पना मांडण्यात आली होती. मागील सहा-सात वर्षे पाठपुरावा केल्यानंतर अखेर नौदलाची निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदार आणि पाणबुडी प्रकल्पाला केंद्राने निधीची तरतूद करत हिरवा कंदील दाखविला होता.

## शवविच्छेदन अहवालावरून राजकारण तापणार!

### अहवाल खोटा असल्याचा सालियन यांच्या वकिलाचा आरोप

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिशा सालियन हिचा शवविच्छेदन अहवाल बाहेर आल्याची चर्चा सर्वत्र जोर धरत असून दिशा सालियनच्या वडिलांनी नियुक्त केलेल्या वकिलाने हा शवविच्छेदन अहवाल मान्य करण्यास नकार दिला आहे. हा अहवाल खोटा असल्याचा आरोप सालियन यांच्या वकिलाने केला आहे. या शवविच्छेदन अहवालात दिशा सालियन हिचा मृतदेह इमारतीपासून अंतरावर पडलेला असल्याचे आढळून आले. दिशाच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमा होत्या. तिच्या हातावर, पायावर आणि छातीजवळ जखमा झाल्याचा उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे. दिशाच्या नाकातोंडातून रक्त आले, मात्र दिशा सालियनवर लैंगिक अत्याचार झाला नसल्याचे या शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे, अशी चर्चा आहे. त्यामुळे आता आणखी राजकारण तापणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

दिशा सालियन हिचा मृत्यू २०२० मध्ये झाला. त्यानंतर तिच्या मृत्यूवरून राजकारण संपलेले नाही. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या. आता हे प्रकरण पुन्हा समोर आले आहे. या प्रकरणात दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचा आरोप केला. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर त्यांनी नवीन तक्रारीसह मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेतली. ही तक्रारच एफआयआर असल्याचा दावा करण्यात आला. यामध्ये डिनो मोरियो, सुरज पांचाली, आदित्य ठाकरे यांच्यासह अंगरक्षक आणि इतरांना आरोपी करण्याची मागणी केली. त्यातच सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी शवविच्छेदनाबाबत एक मोठी मागणी केली आहे.

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा, उपेक्षितांचा, शोषितांचा विकास सरकारचे घटनात्मक कर्तव्यच

कल्याणकारी योजना राबवणे आणि त्यातून समाजातील वंचितांचा, मागासलेल्या घटकांचा, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा, उपेक्षितांचा, शोषितांचा विकास करणे हे कोणत्याही सरकारचे घटनात्मक कर्तव्यच आहे आणि गेली साडे सात दशके विविध सरकारे त्यानुसार विविध कल्याणकारी योजना राबवत आली आहेत. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये लोककल्याणाच्या नावाखाली मोफत वस्तू व सेवा देण्याची एक अघोरी स्पर्धा भारतीय राजकारणात सुरू झाली आहे. त्यामागचा उद्देश एकच, तो म्हणजे आपली व्होटबँक भक्कम करणे. यासाठी कधी निवडणुकांमध्ये जाहीरनाम्याद्वारे आश्वासनांची खैरात केली जाते, तर कधी सत्तेत आल्यानंतर पुन्हा सत्तेत येण्याचा खात्रीशीर मार्ग तयार करण्यासाठी अशा योजनांची बरसात केली जाते. मोफत वीज, मोफत अन्नधान्य, मासिक भत्ता, कर्जमाफी यांसारख्या योजनांमुळे तात्पुरती मदत मिळते, परंतु दीर्घकालीन आर्थिक व्यवस्थापन आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून हा प्रवाह कितपत योग्य आहे, हा प्रश्न निर्माण होतो.


अर्थतज्ज्ञांच्या मते, राजकीय पक्ष हे जनकल्याण कार्यक्रम आणि लोकांना परावलंबी किंवा आश्रित बनवणाऱ्या योजनांमध्ये फारसा फरक करत नाहीत. काही प्रमाणात सरकारी मदत गरजेची असते, परंतु ती कायमस्वरूपी मोफत स्वरूपात दिली गेल्यास स्वावलंबनाच्या संधी कमी होतात. दीर्घकालीन उपाय म्हणून रोजगारनिर्मिती, आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण आणि कौशल्यविकास यावर भर देणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयानेही निवडणुकीच्या आधी जाहीर होणाऱ्या अशा मोफत योजनांवर टीका केली आहे. न्यायालयाच्या मतानुसार, मोफत सुविधा मिळाल्यामुळे अनेक नागरिक काम करण्याची इच्छाशक्ती गमावत आहेत. परिणामी, देशात उत्पादकतेऐवजी परावलंबित्व वाढत आहे. मोफत योजनांऐवजी सबसिडी आधारित मॉडेल राबवून जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आणि वित्तीय शिस्त पाळून राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा समतोल राखणे गरजेचे आहे. कारण अशा योजना म्हणजे राजकीय पक्षांसाठी सत्ता आपल्या हाती कायम ठेवण्याचा हुकमी एक्का असला तरी त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. खरा प्रश्न असा आहे की या मोफत दिल्या जाणाऱ्या सुविधांमुळे खरोखरच देश आणि नागरिकांना काही लाभ होतोय का? सर्वसामान्य नागरिकांकडून कराच्या रूपात घेतलेला पैसा दुसऱ्या गटाला मोफत सुविधा देण्यासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे अनेक वेळा कर भरणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होते. तसेच राज्यांवरचा कर्जाचा भार वाढत चालला आहे त्याचे काय?

आज मोफत लाभ देण्याच्या राजकारणामुळे अनेक राज्ये अमर्याद खर्च करत असून ती ती आर्थिक अडचणीत सापडत आहेत आणि याचा परिणाम भविष्यातील पिढ्यांवर नकारात्मक होऊ शकतो. आपण राज्यनिहाय पाहणी केल्यास दक्षिणेचे प्रवेशद्वार असणाऱ्या कर्नाटक या काँग्रेसशासित राज्यात 'गृहलक्ष्मी योजने' अंतर्गत महिलांना दरमहा २,००० रुपये मिळतात. 'गृहज्योती योजना'अंतर्गत २०० युनिट वीज मोफत दिली जाते. या योजनांवर अंदाजे ५२,००० कोटी रुपये खर्च होणार असून ते राज्याच्या २०२३-२४ वित्तीय तुटीच्या ७८ टक्के आहेत. महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून 'लाडकी बहीण योजना' लागू आहे. या योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ३६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच राज्यातील महामार्गांवरील टोल रद्द करणे, शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि मोफत आरोग्य सेवा यांसारख्या योजनांवर दरवर्षी ४४,००० कोटी रुपये खर्च होणार आहेत. दिल्लीत जवळपास २२ लाख घरांना मोफत वीज पुरवली जात आहे. महिलांसाठी मोफत बस प्रवासाची सुविधा देखील आहे. अलीकडेच झालेल्या निवडणुकीतील विजयानंतर भाजप सरकारने महिलांना दरमहा २,५०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. या मोफत योजनांमुळे दिल्ली सरकारने २०२४-२५ या वर्षासाठी राष्ट्रीय लघू बचत निधीकडून १०,००० कोटी रुपयांचे कर्ज मागितले आहे. पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकमधील सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन देण्यातही अडचणी येत आहेत. मार्च २०२२ पर्यंत हिमाचल प्रदेशावर ६९,००० कोटी रुपयांचे कर्ज होते, जे मार्च २०२४ पर्यंत ८६,६०० कोटी रुपयांवर गेले. मार्च २०२५ पर्यंत हे कर्ज वाढून जवळपास ९५,००० कोटी रुपयांवर जाण्याचा अंदाज आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे मोफत वीज, महिलांना मासिक भत्ता आणि जुनी पेन्शन योजना लागू करणे. देशात सर्वाधिक कर्ज तमिळनाडूवर आहे. त्यानंतर उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्ज आहे. ज्या राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबवण्यात आली, त्या मध्य प्रदेशवर मार्च २०२५ पर्यंत अंदाजे ४.८ लाख कोटी रुपयांचे कर्ज असून ते देशातील एकूण राज्य सरकारी कर्जाच्या ५टक्केहून अधिक आहे. मार्च २०२५ मध्ये राज्य सरकारने २५,००० कोटी रुपये अतिरिक्त कर्ज घेण्याची योजना आखली आहे, जे आर्थिक गरजा भागवण्यासाठी घेतले जाणार आहे. राज्याच्या वाढत्या कर्जावर विरोधकांनी चिंता व्यक्त केली असून, २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाला 'कर्जाचा अर्थसंकल्प' असे संबोधले जात आहे. एका अहवालानुसार, या राज्यातील प्रतिव्यक्ती कर्जभार ५०,००० रुपयांहून अधिक झाला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, मार्च२०२४ पर्यंत सर्व राज्य सरकारांवर एकूण ७५ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते, जे मार्च २०२५ पर्यंत ८३.३१ लाख कोटी रुपयांहून अधिक होण्याचा अंदाज आहे.

# भारतीय स्वातंत्र्य लीग स्थापना दिन विशेष

**भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. सदरची महत्त्वपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करत आहेत... संपादक**

**इंडियन** इंडिपेंडन्स लीगला आयआयएल म्हणूनही ओळखली जाते. ही एक राजकीय संघटना होती जी १९२० ते १९४०च्या दशकात ब्रिटिश भारताबाहेर राहणाऱ्यांना या प्रदेशावरील ब्रिटिश वसाहतवादी शासन हटवण्याच्या प्रयत्नात संघटित करण्यासाठी चालवली गेली. भारतीय राष्ट्रवादींनी स्थापन केलेले, त्याचे उपक्रम आग्नेय आशियातील विविध भागांमध्ये आयोजित केले गेले. त्यात भारतीय प्रवासी आणि नंतर, दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या भागात जपानच्या यशस्वी मलायन मोहिमेनंतर जपानी ताब्यांतर्गत निर्वासित भारतीय राष्ट्रवादीचा समावेश होता. मलायावरील जपानी ताब्यादरम्यान, जपानी लोकांनी मलायामधील भारतीयांना लीगमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले.



भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. प्रामुख्याने भारतीय राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जपानी पाठिंबा मिळवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली लीग विसर्जित होण्यापूर्वी मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या भारतीय राष्ट्रीय लष्कराशी संवाद साधण्यासाठी आणि कमांड देण्यासाठी स्थापन करण्यात आली. रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आईएनए सुपूर्द केली. नंतर दक्षिण पूर्व आशियामध्ये सुभाषचंद्र बोसचे आगमन आणि आईएनएचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर आझाद हिंदला मार्ग देण्याआधी लीग त्यांच्या नेतृत्वाखाली आली.

दक्षिण-पूर्व आशिया व्यापल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर प्रवासी भारतीय लोकसंख्या जपानच्या ताब्यात आली होती. युद्ध मलायापर्यंत पोहोचण्यापूर्वीच स्थानिक भारतीय संघटनांची चौकट अस्तित्वात होती. यापैकी सर्वात मोठे म्हणजे युद्धपूर्व सेंट्रल इंडियन असोसिएशन, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीग आणि इतर संघटनांचा समावेश होता आणि त्यांच्या सदस्यांमध्ये प्रख्यात भारतीय प्रवासी होते, उदा.केपीके मेनन, नेद्यम राघवन, प्रीतम सिंग, एससी गोहो आणि इतर. व्यवसाय प्राधिकरणाच्या प्रोत्साहनाने, या गटांनी स्थानिक भारतीय स्वातंत्र्य लीगमध्ये एकत्र येण्यास सुरुवात केली आणि स्थानिक भारतीय लोकसंख्या आणि जपानी व्यापाऱ्यांमधली प्रमुख संपर्कसंस्था बनली.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

इंडियन इंडिपेंडन्स लीगमध्ये सामील झाल्यामुळे सुरक्षा आणि फायदे मिळाले. आयआयएल कार्ड दाखवल्याने रेल्वे तिकिटाची खरेदी सुलभ झाली आणि टूथपेस्ट आणि साबण यासारख्या कठीण वस्तूंच्या आयआयएल मुख्यालयात वाजवी किमतीत खरेदी करता आली. हे एक साधन होते ज्याद्वारे रेशन जारी केले जात असे. याशिवाय आयआयएलला स्विस रेडक्रॉससोबत काम करण्याची परवानगी असल्याने सदस्यांना पत्रे मिळू शकत होती आणि सिलोनसारख्या ठिकाणी पोहोचणे कठीण होते.

रासबिहारी बोस हे एक भारतीय क्रांतिकारक होते, ज्याने सन १९१२च्या दिल्ली-लाहोरच्या कटाची योजना तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्जच्या हत्येसाठी केली होती आणि १९१५च्या गदर कटात त्यांचा सहभाग होता. राजाच्या शोधात रास बिहारी जपानला पळून गेले होते जिथे त्यांना सापडले. जपानी देशभक्त समाजातील अभयारण्य ठरले होते. त्यानंतर रास बिहारी बोस यांनी जपानी भाषा शिकली, एका जपानी महिलेशी लग्न केले आणि ते जपानी नागरिक बनले. मलायन मोहिमेच्या आधी आणि दरम्यान, रास बिहारी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या उद्दिष्टांसाठी जपानी प्रयत्नांमध्ये रस घेण्याचा प्रयत्न केला होता. फुजिवारा येथील उत्साहवर्धक अहवाल आणि स्थानिक स्वातंत्र्य लीगच्या स्थापनेसह, आईजीएचक्यूने आकार घेत असलेल्या भारतीय चळवळीचा विस्तार आणि एकत्रीकरण करण्यासाठी रास बिहारींची मदत मागितली. रास बिहारी यांनी आईजीएचक्यूला विकसित होत असलेल्या आईएनएला एका राजकीय संघटनेशी जोडण्याचा सल्ला दिला जो दक्षिण-पूर्व आशियातील नागरी भारतीय लोकसंख्येसाठी देखील बोलेल.

मार्च १९४२मध्ये त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लीगच्या स्थानिक नेत्यांना टोकियो येथे एका परिषदेसाठी आमंत्रित केले. हे आमंत्रण स्वीकारण्यात आले आणि दि.२८ मार्च १९४२च्या अखेरीस टोकियो हॉटेलमध्ये शिष्टमंडळ भेटले. टोकियो परिषद मात्र कोणत्याही निश्चित निर्णयापर्यंत पोहोचू शकली नाही. रास बिहारी यांच्याशी अनेक भारतीय शिष्टमंडळाचे मतभेद होते, विशेषत: जपानशी त्यांचे प्रदीर्घ संबंध आणि दक्षिण-पूर्व आशियामध्ये कब्जा करणारी शक्ती म्हणून जपानची सध्याची स्थिती पाहता आणि जपानी हितसंबंधांपासून सावध होते.

परिषदेने भविष्यातील तारखेला बँकॉकमध्ये पुन्हा भेटण्याचे मान्य केले. भारतीय शिष्टमंडळ रास बिहारीसोबत एप्रिलमध्ये सिंगापूरला परतले. सिंगापूरमध्ये रास बिहारी यांना एका सार्वजनिक सभेच्या अध्यक्षतेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. ज्यामध्ये ऑल-मलायन इंडियन इंडिपेंडन्स लीगची घोषणा होती. लीगचे प्रमुख नेद्यम राघवन, एक पेनांग बॅरिस्टर आणि एक प्रमुख मलायन भारतीय होते. प्रशासकीय मंडळात केपी केशवा मेनन आणि एससी गोहो, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीगचे नंतरचे अध्यक्ष होते. लीगने कार्यकारी शाखा म्हणून कृती परिषदेची निर्मिती, प्रादेशिक लीग ज्याला अहवाल देतील अशा मंडळाची निर्मिती, तसेच आईएनए आणि कौन्सिलमधील संबंध तसेच परिषद आणि जपानी प्राधिकरण. या प्रस्तावांवर टोकियो येथे भेटलेल्या प्रतिनिधींनी आणि जपानी भूमीपेक्षा इतरत्र झालेल्या बैठकीत मतदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाही सूचना आहेत की लीगचे सदस्य, ज्यात निरंजन सिंग गिल यांचा समावेश होता, ज्यांनी पीओडब्ल्यू शिबिरांचे दिग्दर्शन केले होते. ते लीग आणि स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात जपानी हेतूंबद्दल घाबरले होते. लीगला भारतीय लोकांमध्ये व्यापक पाठिंबा मिळाला; ऑगस्टच्या अखेरीस सदस्यसंख्या शंभर-हजाराच्या जवळपास असल्याचा अंदाज होता.

युद्धकाळातील आणीबाणीच्या मध्यभागी आणि व्यावसायिक अधिकाऱ्यांशी व्यवहार करताना लीगमधील सदस्यत्व लोकसंख्येसाठी फायदेशीर होते. लीगच्या सदस्यत्व कार्डाने धारकाची ओळख भारतीय आणि एक सहयोगी म्हणून केली होती, त्याचा वापर रेशन जारी करण्यासाठी केला जात असे. पुढे लीगने स्थानिक भारतीय लोकसंख्येची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले, ज्यात आता बेरोजगार मजुरांचा समावेश आहे.

!! भारतीय स्वातंत्र्य लीग स्थापना दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# महामार्ग बांधा, पण संतुलित विकास हवा!

देशभरात पसरलेल्या राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यांनी सुसूत्रीत होत असलेल्या वाहतूक आणि दळणवळणाद्वारे वेळ, अंतर आणि खर्च वाचत असूनदेखील अपेक्षित परिणाम दिसत नसल्यास नियोजनातील त्रुटी दूर करून औद्योगिक आणि उत्पादन क्षेत्राला चालना देण्याची आवश्यकता आहे. असे झाले तरच अशा महामार्गांवर केलेली भविष्यकालीन तरतूद फायदेशीर ठरेल. सध्याच्या या कळीच्या विषयावर टाकलेला प्रकाश.

जगातील एकूण रस्त्यांच्या लांबीच्या दोन टक्के आणि राष्ट्रीय महामार्गावरील सर्व रहदारीच्या चाळीस टक्क्यांसह, भारतामध्ये अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकाचे रस्ते नेटवर्क आहे. भारतात एकूण ५९९ राष्ट्रीय महामार्ग आहेत. ते एक लाख ३२ हजार ५०० किलोमीटर अंतरात पसरले आहेत. रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय उत्तम रस्त्यांची पायाभूत सुविधा पुरवून भारताचे रस्ते नेटवर्क सुधारण्यासाठी समर्पित आहे. भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण देशामध्ये राष्ट्रीय महामार्ग बांधणे, नूतनीकरण करणे आणि त्यांची देखभाल करण्यासाठी जबाबदार आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नियंत्रण करते. २०१४ मध्ये भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून आजवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा कारभार कार्यक्षमतेने सांभाळत आहेत. त्यांच्या कार्यकाळात २०१९-२० या आर्थिक वर्षात १०,२०३७ किलोमीटर, २०२०-२१ मध्ये १३,३२७ किलोमीटर, २०२१-२२ मध्ये १०,४५७ किलोमीटर आणि २०२२-२३ मध्ये १०,३३१ किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले. आज या राष्ट्रीय महामार्गावरून होत असलेली वाहतूक आणि दळणवळणाची साधने अतिशय कार्यक्षमपणे कार्यरत आहेत. त्यामुळे वेळ, अंतर आणि खर्च याची बचत होत असून देशाच्या विकासाला हातभार लागत आहे. गरज पडल्यास सैन्यदलांना या राष्ट्रीय महामार्गांवर फायटर प्लेन्सदेखील उतरवता येतील, लडाखमधील राष्ट्रीय महामार्ग याचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

गडकरींच्या मते, रस्तेबांधणीची ही सर्व कामे भारताला २०४७ पर्यंत विकसित देश बनवण्यासाठी युद्धपातळीवर सुरू आहेत. म्हणजे देशांतर्गत राष्ट्रीय महामार्गांच्या बांधणीवर होणारा खर्च ही दीर्घकालीन गुंतवणूक आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अमेरिका आणि चीनचे उदाहरण घ्यायचे झाले तर दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून रस्ते बांधणीवर केलेला खर्च त्यांच्या विकासाला कारणीभूत ठरला, हे दिसते. केवळ बाह्य राष्ट्रीय महामार्गच नव्हे तर देशांतर्गत रस्त्यांच्या बांधणीवरही चीनने जोर दिला. आज चीन एक मॅन्युफॅक्चरिंग हॉटस्पॉट आणि वर्ल्ड फॅक्टरी म्हणून ओळखला जातो. केंद्र सरकारच्या रस्ते बांधणीच्या योजना आणि त्यातून होणाऱ्या देशाच्या विकासाचा विचार केला तर अशा प्रकारच्या देशांतर्गत रस्तेबांधणीच्या मोठमोठ्या प्रकल्पांवर करोडो रुपयांचा खर्च करून अपेक्षित विकास साधता येईल का, हा मात्र कळीचा मुद्दा आहे. केंद्र सरकारची मेक इन इंडिया ही महत्त्वाकांक्षी योजना मागे पडल्यासारखे वाटत आहे. खरे तर या योजनेअंतर्गत उत्पादित आणि प्रक्रिया होणाऱ्या वस्तूंच्या वाहतुकीला महामार्गांच्या या नेटवर्कचा उपयोग होईल, असा अंदाज होता. मात्र एक तर असे अपेक्षित उद्योगच अस्तित्वात आले नाहीत आणि असलेल्या उद्योगांकडून या रस्त्यांचा नेहमीपेक्षा वेगळा वापर केला जात नाही ही बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे महामार्गांच्या निर्मितीवर होणाऱ्या खर्चाच्या मानाने खरेच देशाचा विकास होतोय का, हा प्रश्न अर्थ मंत्रालयालाही पडला असेल. या खर्चामुळे देशाच्या विकासदरात किंवा नागरिकांच्या राहणीमानात अपेक्षित वाढ होत आहे का, याचे मूल्यांकन व्हायला हवे. २०१४ मध्ये विकासदरामध्ये भारताच्या उत्पादन क्षेत्राचा वाटा ५.९ टक्के इतका होता. २०२५ मध्ये तो १६-१७ टक्के इतका मर्यादित आहे. याचा अर्थ उत्पादन क्षेत्राचा अपेक्षित विकास झालेला नाही. भारतात बांधलेल्या ठरावीकच महामार्गांचा उत्पादन क्षेत्राकडून दळणवळणासाठी वापर केला गेला. परिणामी, 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर कंपन्यांनी बांधलेल्या रस्त्यांवर केलेला खर्च वसूल होणेदेखील अवघड होऊन बसले.

महामार्गांवरील भरमसाट टोलवसुली ही वाहनधारकांसाठी डोकेदुखी बनली आहे. रस्ता बांधण्याचा खर्च आणि वसुली होत असलेला टोल यात कुठलीही पारदर्शकता नसते. देशात कच्च्या मालापासून एखादी उत्पादित वस्तू ग्राहकाच्या हाती पडेपर्यंत प्रत्येक अवस्थेतून जाताना केंद्र सरकारचा कर लागतो. सरकार देत असलेल्या प्रत्येक सेवेचा पुरेपूर मोबदला घेत असते. त्यातच महामार्ग बांधणीपोटी होणाऱ्या खर्चाचा समावेश होतो. राष्ट्रीय महामार्गांच्या बांधणीचा विकासाला हातभार न लागण्याचे एक कारण म्हणजे, भारतात बांधलेल्या रस्त्यांच्या दर्जापेक्षा त्यांच्या प्रमाणाला जास्त महत्त्व दिले गेले. १५०० कोटींचे बजेट असलेल्या बुंदेलखंड एक्स्प्रेस वेवर सहा महिन्यांतच खड्डे पडले. पुलाचा स्लॅब कोसळून तेथून जाणारे कारमधील चार प्रवासी थोडक्यात बचावले. हीच अवस्था देशाची आर्थिक राजधानी मुंबईला जोडणाऱ्या मुंबई-अहमदाबाद, मुंबई-गोवा आणि मुंबई-नाशिक महामार्गांची आहे. अर्थात या महामार्गांचे कालौघात सिद्ध झालेले फायदेही लक्षात घ्यायला हवेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून २०२५-२६च्या अर्थसंकल्पामध्ये ९३५ किलोमीटर लांबीच्या नवीन आठ राष्ट्रीय महामार्गांसाठी ५०,६५५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे देशातील विविध राष्ट्रीय महामार्ग आणि कॉरिडॉर जोडले जाऊन देशाच्या औद्योगिक विकासाला हातभार लागेल तसेच ४४ लाख रोजगारांची निर्मिती होईल, असा सरकारचा दावा आहे. येथे एक साधे उदाहरण तपासून पाहता येईल. पूर्वी मुंबई-पुणे हे अंतर सुमारे चार तासांमध्ये कापले जायचे. मात्र २००२ मध्ये बांधलेल्या एक्स्प्रेस वेमुळे हे अंतर आज सुमारे अडीच तासांमध्ये कापले जाते. याच रस्त्यावरील चौक गावापासून जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत (न्हावा-शेवा) नव्या महामार्गाची जोड मिळाल्यामुळे देश-परदेशादरम्यान होणाऱ्या आयात निर्यातीच्या दृष्टीने फार मोठी सोय होईल, कारण यानिमित्ताने मुंबई-पुणे-बंगळूरु आणि मुंबई-गोवा हे दोन महामार्गही एकमेकांना जोडले जातील. अशाच ९३५ किलोमीटर लांबीच्या नवीन ८ राष्ट्रीय महामार्गांद्वारे वेळ, आंतर आणि खर्च वाचणार असेल तर ते महत्त्वाचे आहे. म्हणजेच पूर्वी बांधलेल्या राष्ट्रीय महामार्गांना अंतर्गत जोडणी मिळून विकासाला नवी दिशा मिळेल. रस्ते विकासामुळे जनतेची सोय आणि शासनाला महसूल असे समीकरण बनल्याने या प्रकल्पांना फारसा विरोध होत नाही. या महामार्ग प्रकल्पात पर्यावरण जैवविविधतेची किती हानी झाली, स्थानिक परिसंस्थेचा किती तोटा झाला याचा हिशेब, ताळेबंद कोणीही मांडलेला नाही. त्यामुळे अशा प्रकल्पांची व्याप्ती वाढत आहे. रस्ते विकास प्रकल्पांमध्ये शासन, कंत्राटदार, व्यापारी यांना मोठा आर्थिक फायदा झाला. गाड्या वेगाने धावू लागल्या. कमी वेळेत प्रवास सुखकर होऊ लागला, अशा आम जनतेच्या प्रतिक्रिया उमटल्या; परंतु पर्यावरणाच्या हानीबाबत फार कोणी बोलत नाही. कारण आपल्याला मानवी विकास महत्त्वाचा वाटतो.

पर्यावरणाची किंमत वाटत नाही. इतर सर्व रस्ते महामार्ग प्रकल्पांबाबतही जनतेची अशीच मानसिकता आहे. विकास साधायचा तर पर्यावरणाचे थोडेबहुत नुकसान अपेक्षित असते, पण उत्तराखंड आणि जोशीमठ येथे धरणीभंगाच्या गंभीर घटना घडल्या आहेत. आता तर केंद्र सरकारने महामार्ग बांधणीच्या आड येणाऱ्या पर्यावरणासंबंधी कायद्यांमध्ये बदल करायची तयारी सुरू केली आहे. ८०२ किलोमीटर लांबीचा नियोजित नागपूर-गोवा द्रुतगती मार्ग म्हणजेच शक्तिपीठ द्रुतगती मार्ग आता आकाराला येत आहे. हा द्रुतगती मार्ग महाराष्ट्रातील ११ आणि गोव्यातील एका जिल्ह्यातून जाणार आहे. खरे तर गोवा, कोकण किनारपट्टी आणि विदर्भ यांना जोडणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. शक्तिपीठ महामार्गाला लागणाऱ्या जमिनी घेण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. शेतजमिनी अधिग्रहण करण्याचे काम चालू आहे. काही शेतकरी या प्रकल्पामुळे बाधित होणार आहेत.

सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला विरोध सुरू केला आहे. मात्र प्रकल्प पूर्ण झाल्यास गोव्यातील समुद्र संपत्तीचे अंतर्गत व्यापार म्हणून विदर्भात आणि विदर्भातील खनिज संपत्तीचे निर्यातीसाठी कोकणात दळणवळण होऊ शकेल, हे नाकारता येत नाही. जुन्या राष्ट्रीय महामार्गांना जोडून नवे रस्ते बांधण्यामागे हीच कल्पना असावी. देशाच्या विकासदरात उत्पादन क्षेत्राचा मोठा वाटा असतो. पण उत्पादन क्षेत्राचा विकास हा केवळ देशातील महामार्गांवरच अवलंबून असतो असे नाही. त्याला इतरही घटक कारणीभूत ठरतात. विकासाच्या नियोजनातील त्रुटी दूर करून औद्योगिक आणि उत्पादनक्षेत्राला चालना देण्याची आज आवश्यकता आहे. मात्र त्यात समोर येणाऱ्या अडचणी आणि पर्यावरणाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. म्हणजेच महामार्ग उभे राहावेत, पण सुनियोजित, संतुलित विकास व्हायला हवा, हेही खरेच.

- शंतनू चिंचाळकर

# कुणाल कामराच्या कॉमेडी शोच्या बुकिंगचे पैसे मातोश्रीतून आले! शिवसेना नेते संजय निरुपम यांचा गंभीर आरोप

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिशा सालियन हत्येच्या मागे आमदार आदित्य ठाकरे यांचा हात असल्याचा संशय आता अधिक बळावत आहे, असा गंभीर आरोप शिवसेना उपनेते आणि प्रवक्ते संजय निरुपम यांनी केला आहे. या प्रकरणाशी मुंबईतील सेलिब्रिटी ड्रग्ज रॅकेटचा संबंध असल्याचेही त्यांनी सांगितले.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आदित्य ठाकरे बाबतची चर्चा वाढू लागल्यावर उबाठा गटाकडून सदर प्रकरणावरुन लक्ष विचलीत करण्यासाठी मुद्दामहून कुणाल कामराचे वादग्रस्त गाणे व्हायरल करण्यात आले, असा आरोप संजय निरुपम यांनी केला.

शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील टीकेवर कुणाल कामरावर निश्चित कारवाई होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांनी केलेले नवे आरोप गंभीर असून, त्यांच्या तक्रारीवर लवकरच मालवणी पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवला जाईल, असे निरुपम यांनी स्पष्ट केले.

उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांची दिशा सालियन हत्याकांडात मोठी भूमिका आहे, याचे ठोस पुरावे आमच्याकडे आहेत, असा दावा संजय निरुपम यांनी पत्रकार परिषदेत केला.

सतीश सालियन यांनी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. ही तक्रार मालवणी पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदणीसाठी पाठवण्यात आली आहे. दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता, आणि तो संशयास्पद होता.

मृत्यूपूर्वीच्या पार्टीत अनेक सेलिब्रिटींची उपस्थिती होती, अशी माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने या प्रकरणी विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले असून चौकशी सुरू आहे. पोस्टमार्टम अहवाल तीन दिवस उशिराने मिळाला. दिशाचा मृतदेह इमारतीपासून २५ फूट अंतरावर सापडला, मात्र शरीरावर कोणतीही जखम नव्हती. या सर्व गोष्टी संशयास्पद असून, नव्याने सखोल चौकशी होणे गरजेचे आहे, असे निरुपम म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी सुप्रीम कोर्टात खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले. सीबीआयने दिशा सालियन नव्हे, तर सुशांत सिंह राजपूत हत्येचा तपास केला होता. त्यामुळे खोट्या प्रतिज्ञापत्रावर कारवाई होईल, असे निरुपम यांनी सांगितले.


आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मोरिया यांच्यावर संशय आहे.

हे सर्वजण ड्रग्ज रॅकेटशी संबंधित असल्याचा आरोप आहे. ड्रग्ज पुरवठादार समीर खान याने नार्कोटिक्स ब्युरोकडे कबुली दिली होती. चौकशीत समीर खानने आदित्य ठाकरे ड्रग्ज घेत असल्याचे सांगितले होते.

# इलेक्ट्रिक वाहन रॅली उद्या प्रदूषणमुक्त भविष्यासाठी पुढाकार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) आणि ऊर्जा दक्षता ब्युरो (BEE) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.२९ रोजी इलेक्ट्रिक वाहन रॅली आयोजित करण्यात आली आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता टी. व्ही. सेंटर मैदानावरून ही रॅली सुरू होईल आणि क्रांती चौक येथे समारोप होईल.



या रॅलीचे उद्धाटन अपारंपारीक उर्जा मंत्रीनअतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे. जास्तीत जास्त ई- वाहनांनी या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक विनोद सिरसाट यांनी केले आहे.

**ई-वाहनांचा प्रसार आणि प्रोत्साहन**

इंधनावर असलेले परकीय अवलंबन कमी करून स्वच्छ आणि हरित ऊर्जा वापरणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डिझेल आणि पेट्रोलच्या वाढत्या किंमतींमुळे भारताला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करावे लागते. भारत हा चीननंतर सर्वाधिक फॉसिल फ्युएल आयात करणारा देश आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक ई-वाहनांना प्रोत्साहन देणे आणि चार्जिंग सुविधांचा विस्तार करणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१**

राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन, चार्जिंग सुविधा, गुंतवणूक आणि संशोधन वाढविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने २०२१ मध्ये इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले. यामध्ये २०२५ पर्यंत १०% नवीन वाहने इलेक्ट्रिक असावीत आणि सार्वजनिक वाहतूक, मालवाहतूक आणि खासगी वाहन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर ई-वाहनांचा वापर वाढवावा, अशी उद्दिष्टे आहेत.

**महत्वाची उद्दिष्टे**

२०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १०% हिस्सा ई-वाहनांचा असेल.

मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये २५% सार्वजनिक वाहतूक ई-वाहनांची असेल.

MSRTC च्या ताफ्यात १५% बस ई-वाहने असतील. राज्यात इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षेत्रात मोठी गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती होईल. चार्जिंग स्टेशनसाठी प्रत्येक ३ किमी अंतरावर एक सार्वजनिक चार्जिंग सुविधा उभारण्यात येईल.

**ई-वाहनांना प्रोत्साहन आणि कर सवलती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जाहीर केले की, राज्यातील मंत्र्यांसह शासकीय अधिकाऱ्यांना ई-व्हेईकल प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन प्रकल्प उभारले जात आहेत, ज्यामुळे राज्य हे राष्ट्रीय ई-व्हेईकल कॅपिटल बनेल.

**प्रदूषणमुक्त महाराष्ट्रासाठी सहभागाचे आवाहन**

या उपक्रमाद्वारे वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी होईल तसेच नागरिकांमध्ये ई-वाहनांबाबत जनजागृती होईल. त्यामुळे सर्व ई-वाहन उत्पादक, डीलर्स आणि वापरकर्त्यांना या रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक विनोद सिरसाट यांनी केले आहे.

# वैद्यकीय परिषद निवडणूक गुरुवारी(दि.३ एप्रिल)

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर, दि.२७(जिमाका)- उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.७२/२०२४ प्रकरणातील निकालानुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर एकूण ९ (नऊ) सदस्य निवडणूकीसाठी गुरुवार दि.३ एप्रिल रोजी निवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत उमेदवार आणि उमेदवारांचे प्रतिनिधी यांना कळिवण्यात आले आहे की, वैद्यकीय परिषद निवडणूक - २०२५ या निवडणूकीकरीता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे दि.३१ डिसेंबर २०२४ पर्यंत नोंदणी झालेले व नोंदणीचे नुतणीकरण केलेले वैद्यकीय व्यावसायिक हे मतदार आहेत. मतदार यादीनुसार जिल्ह्यातील ४३५२ मतदार या निवडणूकीमध्ये मतदान करण्यास पात्र आहेत. प्रत्येक मतदारांस एकूण ९ मते देण्याचा अधिकार आहे. निवडणूक कार्यक्रमाची सुचना निर्वाचन अधिकाऱ्यांमार्फत शासन राजपत्रात दि.१७ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या निवडणूकीकरीता एकूण ४१ उमेदवार रिंगणात आहेत.जिल्ह्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांची नावे समाविष्ट असलेली मतदार यादी निर्वाचन अधिकाऱ्यांकडून पुरविण्यात येणार आहे. मतदारयादीत समाविष्ट असलेले नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक निवडणूकीतील मतदार आहेत.

तरी या निवडणुकीसाठी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांनी मतदान प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर मतदानाचे ठिकाणी उपस्थित राहावे. मतदानाचे ठिकाण - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, मतदान गुरुवार,दि.३ एप्रिल; वेळ-सकाळी ८ ते सांयकाळी ५ पर्यंत, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी कळिवले आहे.

# अखेर क्लीन अप मार्शल रस्त्यावरून हद्दपार!

मुंबई : मुंबई महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि 'स्वच्छ मुंबई अभियान'अंतर्गत मुंबईत स्वच्छतेसाठी नेमण्यात आलेल्या 'क्लीन अप मार्शल'च्या संस्थांचे प्रतिनिधींबाबत सातत्याने येणाऱ्या तक्रारींची गंभीर दखल घेत या प्रतिनिधींची सेवा खंडीत करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

त्यामुळे संबंधित 'क्लीन अप मार्शल' म्हणून नेमण्यात आलेले प्रतिनिधी आणि संबंधित संस्थांची सेवा ४ एप्रिल २०२५ पासून खंडीत करण्यात येणार असल्याची घोषणा महापालिकेने अधिकृतपणे केली आहे. त्यामुळे आता क्लीनअप मार्शलकडून होणारी लूट बंद होणार असून तरीही ४ एप्रिल २०२५ नंतर या 'क्लीनअप मार्शल'कडून दंड आकारणी होत असल्यास नागरिकांनी संबंधीत प्रशासकीय विभागाशी (वॉर्ड ऑफिस) संपर्क साधावा, असे आवाहनही महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# मुंबईतील संभाव्य प्रदूषणाची माहिती आगावू मिळवणार महापालिका

## तातडीने उपाययोजना करण्यासाठी बसवली जाणार आगावू सूचना यंत्रणा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईतील संभाव्य प्रदूषणकारी घटनांवरती तातडीचे उपाय सुचविणारी अशी आगाऊ सूचना मंत्रणा आता मुंबई महानगरपालिकेच्यावतीने बसवली जाणार आहे. हवेच्या शुध्दत्तेसाठी एक डायनेमिक मॉडलिंग सिस्टिम तयार करुन घेण्यात येत असून या यंत्रणेमुळे हवेच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवून व त्याचे नियोजन करता येणार आहे. या यंत्रणेद्वारे मुंबई शहरात संभाव्य हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी स्त्रोतांच्या ठिकाणी केलेल्या उपाययोजनांकरता मेट्रो इत्यादी बरीचशी पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणात चालू आहेत. तसेब वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे शहरात पीएम २.५ व पी.एम. १० प्रतीच्या धुळीचे प्रमाण वाहले आहे. साधारण वातावरणात पश्चिमी वा-यांमुळे शहरातील धूळ मिश्रीत धुके समुद्राकडे वाहत जाते. परंतु वातावरण बदलामुळे प्रामुख्याने हिवाळ्यात वाहत्या वा-याचा प्रवाह कमी झाल्यामुळे मोठया प्रमाणातील प्रदूषिफा चुके मुंबई शहरावरच आच्छादून राहते आणि असे प्रदूषण आरोग्यास घातक असते.

मुंबईतील हवेच्या खालावलेल्या प्रतीमुळे मुंबईच्या नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेल्या परिणामांची कसून निरीक्षणे उच्च न्यायालयाने नोंदवली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (म.प्र.नि.नं.), भारतीय उष्णदेशीष मौसम विज्ञान संस्थान **(IITM)** व मुंबई महानगरपालिका यांनी मुंबईत बसविलेल्या हवा गुणवत्ता केंद्रांमधील निष्कर्षांनुसार मुख्यतः हिवाळ्यात मुंबईची गुणवत्ता मध्यग ते खराब दर्शवते. प्रदूषणावर पुरेपूर उपाय करुन जेथे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होते, तेथे सुधारित वातावरणासाठी पुरेसे उपाय करणे जरुरीचे असल्याचेही न्यायालयाने नमुद केले होते.

मुंबईसारखीच दिल्ली शहरात वायूप्रदुषणाची समस्या भेडसावत असल्याने पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थान, भारतीय हवामान विभाग व भारतीय मध्यम अवधी हवामान पुर्वानुमान केंद्र यांनी एकत्रपणे उच्च रिझोल्यूशन हवा गुणवत्ता प्रणाली ही दिल्ली एनसीआर विभागासाठी तयार केली आहे.

ही प्रणाली हवामानाचा अंदाज, प्रदूषण हे लो कॉस्ट सेन्सरच्या डेटावर आधारीत पुढील सात दिवसांसाठी हवेच्या गुणवत्तेबाबत आगावू सूचना देते.

# बॉबकार्डच्या महिला आर्थिक साक्षरता व सायबर सुरक्षा उपक्रमाचे राज्यपालांकडून कौतुक



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महिलांमध्ये तसेच शालेय व महाविद्यालयीन मुलींमध्ये सायबर सुरक्षा व आर्थिक साक्षरता वाढावी यासाठी बॉबकार्डने हाती घेतलेले जनजागृती अभियान कौतुकास्पद असून या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होईल असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपालांच्या हस्ते बॉबकार्डच्या 'स्त्री टेक प्रगती' अभियाना अंतर्गत 'शक्ती समृद्धी' व 'लक्ष्मी समृद्धी' या उपक्रमांचे उदघाटन यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या उपक्रमांतर्गत महिला बचत गट तसेच शालेय व महाविद्यालयातील मुलींमध्ये सायबर सुरक्षा व आर्थिक साक्षरता याबाबत जनजागृती केली जाणार आहे. बॉबकार्डच्या सीएसआर उपक्रमाच्या माध्यमातून आहान फाउंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

आज जगात सर्वाधिक आर्थिक डिजिटल देवाण घेवाण भारतात होत आहेत. अशावेळी डिजिटल यंत्रणा पूर्णपणे सुरक्षित असणे आवश्यक आहे. या दृष्टीने सर्वच समाज घटकांमध्ये सायबर सुरक्षा व आर्थिक साक्षरता होणे गरजेचे आहे असे सांगून आदिवासी महिलांच्या उन्नतीसाठी आगामी काळात आपण राज्यातील अधिकाधिक आदिवासी विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणार असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

आज मुली सर्वच क्षेत्रात आघाडीवर असून विद्यापीठांच्या दीक्षांत समारोहात १० पैकी सात पदके मुली जिंकत आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. महिलांचे आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण होत असताना कुटुंब व्यवस्था पूर्वीप्रमाणेच बळकट राहणे आवश्यक आहे. महिला बचत गटांमामुळे ग्रामीण भागात अर्थक्रांती होत असून विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी विकास हा सर्वसमावेशक असला पाहिजे व त्यात अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास जाती सर्वांचा विकास झाला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी महिला व बालकल्याण विकास राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर यांनी शासनाच्या महिला विषयक योजनांची माहिती दिली. राज्यपालांच्या हस्ते ठाणे जिल्ह्यातील निवडक शाळांच्या मुख्याध्यापकांना त्यांच्या डिजिटल लॅबसाठी संगणक वाटप करण्यात आले तसेच प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.


कार्यक्रमाला बॉबकार्डचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र राय, आहान फाउंडेशनच्या विश्वस्त शिल्पा चांडोलकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती, बॉबकार्डचे सीएसआर प्रमुख रवी खन्ना यांसह विविध शाळांचे मुख्याध्यापक आणि बचत गटांचे सदस्य उपस्थित होते.

# निवृत्तीवेतनास विलंबाची शक्यता

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हा कोषागाराअंतर्गत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांचे मार्च महिन्याचे निवृत्तीवेतन प्रदान करण्यास विहित कालावधीपेक्षा २-३ दिवस विलंब होण्याची शक्यता असल्याचे सहा. संचालक (निवृत्तीवेतन) श्रीमती सुषमा बुरकुले यांनी कळिवले आहे. तरी निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनी सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

# कशेडीच्या दोन्ही बोगद्यात ऐन उन्हाळ्यात गळती सुरू




खेड: मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी असलेल्या दोन्ही बोगातून ऐन उन्हाळ्यात गळती सुरू झाली आहे. दीड वर्षांपूर्वी सुरू झालेल्या एका बोगद्यातील गळती थोपा थोपवण्याचा राष्ट्रीय महामार्गाचा प्रयत्न फोल ठरला असून नुकताच सुरू झालेल्या दुसऱ्या बोगद्यातून देखील पाण्याची गळती सुरूच आहे.

बोगद्यातील कामांवर कोट्यवधी रुपयांचा चुराडा करुनही गळती थांबता थांबेना झाल्या आहेत.

गळती रोखण्यासाठी 'प्रकटींग'चा अवलंबही फोलच ठरल्याने वाहनचालकांचा जीव टांगणीला लागला आहे. त्यामुळे बोगद्यातून प्रवास करणाऱ्या दुचाकी चालकांचा प्रवास हा रखडतच राहणार असून दोन्ही बोगधात ठिकठिकाणी लागलेल्या या गळतीने वाहनचालकांच्या गतिमान प्रवासात 'विघ्न' निर्माण झाले आहे. बोगद्यातील गळती रोखण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने ग्राऊंटींगचा अवलंब केला. यासाठी २० हजाराहून अधिक सिमेंट बंगांचा वापर केल्यानंतर गळती थोपवण्यात यश आल्याचा दावाही राष्ट्रीय महामार्ग खात्याकडून केला जात होता. मात्र बोगद्यात गळतीचे सत्र सुरूच आहे. त्यामुळे महामार्ग खात्याची डोकेदुखी वाढली आहे.

## श्री.क्षेत्र पंचाळेश्वर येथे शनि अमावस्या निमीत्त भगवान मुनिसुव्रतनाथांचा महामस्तकाभिषेक सोहळयाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंचाळेश्वर येथील दिगंबर जैन समाजाचे श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र आहे भारत भर प्रसिध्द आहे. गोदावरी काठेवर असलेले हे क्षेत्र अत्यंत दिव्य असून येर्णाया भाविकांचे आकर्षण ठरत आहे. हा सोहळा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव व मयंकसागर म हाराज यांच्या आशीर्वादाने आयोजीत करण्यात आला आहे. शनि अमावस्या निमीत्त सकाळी २९ रोजी शनीवार १० वाजता भगवान मुनिसुव्रतनथाचां महामस्तकाभिषेक सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

यावेळी उपस्थित भाविकांना लिलाबाई, वनमाला, सतिश, पुजा, स्वप्नील, कोमल, शुभम, रणदिवे परिवार गुळजवाला यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील जैन भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष गौतम काला ऊपाध्यक्ष ऋशब गंगवाल सूहास चूडीवाल सचिव भाऊसाहेब बाकलीवाल कोषाध्यक्ष संजय सेठी सहसचिव विजय पापडीवाल कैलास खोबरे विश्वस्त प्रकाश सेठी संदीप कासलीवाल, विलास पहाडे भगवानदास काला अशोक कासलीवाल राजेद्र काला संतोष अजमेरा हिरालाल धोदलकर, कार्यकारणी अध्यक्ष सुनिल पाटणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियूष कासलीवाल यानी दिली .

# तुती लागवड एक शेतीपूरक व्यवसाय

शेतकरी पिढ्यानपिढ्या पारंपरिक शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, काही शेतकरी नव्या वाटा शोधून शेतीमधून भरपूर उत्पन्न कमावत असतात. रेशीम शेती म्हणजेच तुती लागवड ही अशा शेतकऱ्यांसाठी एक चांगला मार्ग आहे. थोडे कष्ट, व्यवस्थितपणा व शिस्त यांचा अवलंब केला तर कमी खर्चात रेशीम शेतीतून भरघोस उत्पन्न घेता येते व आपल्या कुटुंबातील सर्वांना रोजगारही पुरवता येतो. जाणून घेऊया तुती रेशीम शेती विषयीः

**रेशीम शेतीचे महत्त्व**

रेशीम शेती हा शेतीपूरक उत्कृष्ट जोडधंदा आहे. वर्षातून ४ ते ५ पिके घेता येतात. एकदा केलेली तुती लागवड १० ते १५ वर्षे टिकते. पर्यावरणपूरक व्यवसाय, कमीत कमी रासायनिक खतांचा वापर, घरातील प्रत्येक व्यक्तीला घरातच रोजगार मिळतो. त्यामुळे मजुरीचाही प्रश्न मिटतो. इतर पिकांच्या तुलनेत कमी पाणी व खते लागतात. उत्पादित कोषांना बाजारपेठेत चांगला भाव मिळतो. शासनातर्फे नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

**लाभार्थी शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना**

नवीन शेतकऱ्यांना एकरी ५०० रू. भरून लागवडीसाठी नोंदणी करून सभासद होता येते. अशा शेतकऱ्यांना अंडीपुंज अनुदान योजना, प्रशिक्षण, सिल्कसमग्र योजना अंतर्गत लाभ, म. न. रे. गा., या अनुदान योजनांचा त्या शेतकऱ्यांनी शासनाचे आवश्यक ते निकष पूर्ण केल्यानंतर लाभ घेता येतो.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तुती लागवड योजना**

स्वतःच्या शेतीवर काम करून शासनामार्फत मजुरी मिळणारी ही एकमेव योजना आहे. शासनम ान्य समूहात तुती लागवड (एका गावात किमान १० शेतकरी, १० एकर आवश्यक). रेशीम शेती योजनेंतर्गत पूर्वी लाभ घेतलेले शेतकरी नसावेत. कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ मिळेल. प्रति लाभार्थी फक्त एक एकर तुती लागवड मर्यादा. लाभार्थी निवडीमध्ये नियमाप्रमाणे सामाजिक आरक्षण. ग्रामसभेच्या ठरावाद्वारे लाभार्थी निवड. मनरेगा अंतर्गत ३ वर्षांमध्ये अकुशल मजुरी म्हणून एकूण २ लाख ६५ हजार ८१५ रूपये व कुशल मजुरी रक्कम १ लाख ५३ हजार रूपये अशी एकूण ४ लाख १८ हजार ८१५ रूपये इतकी रक्कम मिळते.

सिल्कसमग्र योजनेंतर्गत तुती लागवड, सिंचन संच, कीटक संगोपन गृह, कीटक संगोपन साहित्य, निर्जंतुकीकरण साहित्य यासाठी एक एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ३ लाख ७५ हजार रूपये तर अनुसूचित जातीसाठी ४ लाख ५० हजार रूपये व २ एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ४ लाख ६८ हजार ७५० रूपये तर अनुसूचित जातीसाठी ५ लाख ६२ हजार ५०० रूपये इतके अनुदान आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, विजयनगर, सांगली येथे संपर्क साधावा.

संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सांगली

## सिल्लोड तालुक्यातील सोनाप्पा वाडी येथील शेतकरी धनराज बैनाडे यांच्या घराला आग लागून सात लाखाचे नुकसान



**सिल्लोड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सिल्लोड सोनप्पावाडी येथील शेतात राहणारे शेतकरी धनराज जादुसिंग बेनाडे यांच्या राहत्या घराला आकस्मित आग लागून २३ मार्च रोजी सर्व धान्य दाळी कपडे दागिने रोख रक्कम आधी जळून खाक झाले अशा ह्या संकटग्रस्त शेतकऱ्याला समाजाकडून उभा राहण्यासाठी मदत करण्याची गरज आहे नुसते अंगावरच्या कपड्यावर हा परिवार रस्त्यावर आला पती–पत्नी शेतात काम करत असताना आपल्या घरातून धूर आणि जाळ येत आहे हे पाहून धावले मुल सुरक्षित आहे हे बघताच त्यांना हाय वाटले त्यांनी आरडाओरडा करून आसपासच्या शेतवस्तीतील लोकांना रडण्याचा आवाज आला आणि तेही धावले पण कोणाच्या हाती काही लागले नाही कसेबसे सिलेंडरची टाकी बाजू करण्यात यश मिळाले.

या पंचक्रोशीत लोकांनी सांगितले यांनी अतिशय बिकट परिस्थिती परिस्थितीतून कसेबसे घर उभे केले पत्र्याचे तेही जळाले व मुलांचे शिक्षण व नुकत्याच घरात धान्य साठवून ठेवलेले तेही जळाले आणि मुलीच्या मुलीच्या विवाहाची तयारी चालू होती अशा परिस्थितीत होत्याच नव्हतं झालं अतिशय दयनीय अवस्था यात २५ ग्रॅम किमतीचे सोने दोन लाख २५ हजार रुपये होते दोन लाख रुपयांचे रुपये कॅश तेही जळाले गहू दहा पोते तर ज्वारी चार पोते, हरभरा पंधरा क्विंटल, रासायनिक खतांच्या वीस गोणी तिल लाखचे तर एकुण सात लाख पंचवीस हजार रुपये नुकसान झाले.

अशा आपत्ती संकट ग्रस्त शेतकऱ्याला शासन नियोजन तरतुद हवी आहे ते दिसतं नाही नुसतं पंचनामा करून ते उपाशीपोटी ना छत ना अन्नधान्य आपणं आपल्या माणसांसाठी मदत करूया प्रत्यक्ष घटनास्थळी सामाजिक कार्यात एल डी ताटू शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावीसंस्था वतीने अकरा हजार रुपये चेक दिला सोशल नेटवर्कर प्रिंट मीडिया संपर्क साधुन घर जळीत बेचीराख झाले ते परत उभं करुया यावेळी श्री काळुराम सिंगल यांनी पांच हजार रुपये मदत केली.

संग्राम लखवाल पांच हजार रुपये मदत व गोवर्धन शेवगण, नारायण उटाडे, प्रकाश बेडवाल आदींनी मदत केली एलडी ताटू अहवान केलें ह्याच धर्म संकटात सापडलेल्या शेतकरी धनराज बैनाडे सोनाअप्पावाडी ता.सिल्लोड नव्याने घरं उभारणीसाठी मदत होईल यासाठी 'फोन पे' वर मदत करून माणुसकी जपुया यांत सहभागी व्हावे, असे आवाहन एलडी ताटू यांनी केले.

## राज्य ग्राहक हेल्पलाईन 'राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन' मध्ये विलीन

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे 'राज्य ग्राहक हेल्पलाईन' हे ३१ मार्च २०२५ रोजी मध्यान्हानंतर बरखास्त करून ङ्ग मध्ये विलीन करण्यात येत आहे. या हेल्पलाइनकडे राज्यातील सर्व ग्राहकांनी १ एप्रिल २०२५ पासून आपल्या समस्या व तक्रारी मांडाव्यात, अशी जाहीर सूचना कक्ष अधिकारी ईशा पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

राज्यात 'कंझ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई' या संस्थेच्या मदतीने 'राज्य ग्राहक हेल्पलाईन' ची २१ ऑक्टोबर २०१० च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली होती. उपभोक्ता मामले विभाग, भारत सरकार यांच्या सुचनेनुसार, २६ मार्च २०२५ रोजीच्या शासननिर्णय क्र. संकिर्ण–२०२५/प्र.क्र१०/ग्रासं–२ अन्वये राज्य ग्राहक हेल्पलाईन ही ३१ मार्च २०२५ मध्यान्हानंतर पासून बरखास्त करुन राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन मध्ये विलिन करण्यात आली आहे. तरी, राज्यातील सर्व ग्राहकांस विनंती आहे की, १ एप्रिल, २०२५ पासून सर्व ग्राहकांनी आपल्या समस्या व तक्रारी ङ्गराष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनङ्ग कडे मांडाव्यात.

याकरीता पुढील माध्यमांचा वापर करावा. ई–मेल आय डी: nch-ca@gov.in, टोल फ्री क्रमांकः १८००११४००० किंवा १९१५ (सार्वजनिक सुट्टया सोडुन इतर सर्व दिवशी –सकाळी ०८:०० ते रात्री ०८:००), htt{s://consumerhel{line.gov.in/user/signu.h या वेब पोर्टलद्वारे, एसएमएस तसेच व्हाट्सअपद्वारे ८८०००००१९१५ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच NCH$ APP द्वारे, ग्राहक णचअछत्रः अझझ द्वारे आपल्या तक्रारींची नोंद करु शकतात, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवले आहे.

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन





**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विधानसभेचे नवनियुक्त उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दादर येथील चैत्यभूमी येथे भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तसेच शिवाजी पार्क येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

## जलजीवनचे रडगाणे अखख्या महाराष्ट्रात, जिल्ह्यात खुलताबाद तालुका सर्वात मागे




**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र सरकार व राज्य सरकारच्या समन्वयातून गेल्या पाच वर्षां पासून सुरु असलेल्या जलजीवन योजनेचे रडगाणे अखख्या महाराष्ट्रात सुरु असुन,या अंतर्गत खुलताबाद तालुक्यातील काम खुपच मागे असल्याचे प्रतिपादन विधानपरिषद विरोधी पक्ष नेते आमदार अंबादास दानवे यांनी गुरुवारी (दि.२६) खुलताबाद येथे आयोजित आढावा बैठकीत केले.

खुलताबाद पंचायत समिती सभागृहात शेतकरयांसह इतर विविध समस्यांबाबत विरोधी पक्ष नेते दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठकीत घेण्यात आली,या बैठकीत तालुक्यातील जलजीवन मिशनचा विषय चांगलाच गाजला,ही योजना राबविताना गांव निहाय सर्वेक्षणासाठी नेमलेल्या खाजगी संस्थेने सुचविलेल्या कामा नुसार योजनेचे काम झाले असले तरी ही कामे अपुर्ण अवस्थेतच आहेत,आता ती सुधारित अंदाज पत्रकाच्या प्रतिक्षेत आहेत.या योजने अंतर्गत जिल्ह्यासाठी ५३९ कोटी मंजुर झाल्याची माहिती यावेळी आ.दानवे यांनी दिली. या आढावा बैठकीत अतिवृष्टी अनुदान,कापसाचे अनुदान,तसेच महावितरणच्या भोंगळ कारभाराचा मुद्दा गाजला. या आढावा बैठकीला तहसीलदार स्वरुप कंकाळ, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक,पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, पंचायत समितीचे शाखा अभियंता नरेंद्र राजे देशमुख. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता दिलीप कोलते.यांच्यासह शिवसेना तालुका प्रमुख राजु वरकड सर्कल प्रमुख विजय प्रल्हाद चव्हाण.विधानसभा संघटक गणेश आधाने,शिवसेना जेष्ठ नेते शंकर काका आधाने.शहर प्रमुख विष्णू फुलारे आकाश हिवर्डे. साईनाथ माजकर प्रकाश वाकळे. पुंजाराम अण्णा नलावडे.दत्ता मालोदे. मुकेश मालोदे यांच्यासह विविध पदाधिकारी व अधिकारी,तलाठी,ग्रामसेवक,उपस्थित होते.

## सर्वसामान्य कार्यकर्त्याची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड हे संविधानाचे सामर्थ्य - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एक सामान्य कार्यकर्ता विधानसभेच्या उपाध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर विराजमान होतो हे आपल्या संविधानाचे सामर्थ्य आहे, असे स्पष्ट करत विधानसभेच्या उपाध्यक्षपदी सदस्य अण्णा बनसोडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अण्णा बनसोडे यांच्या सामाजिक व राजकीय कारकिर्दीचा उल्लेख करत सांगितले की, एक साधा कार्यकर्ता ते विधानसभेचा उपाध्यक्ष हा प्रवास प्रेरणादायी आहे. ते जनतेच्या विश्वासावर पुढे आले असून, त्यांच्या अनुभवाचा सभागृहाला निश्चितच लाभ होईल.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, हे शासन सर्वसामान्यांना न्याय देणारे आहे. सर्वसामान्यांना न्याय देणाऱ्या या सभागृहात सामान्य कार्यकर्त्याची उपाध्यक्षपदी निवड झाली याचा मला मनस्वी आनंद झाला आहे.

उपाध्यक्षपदावरून अण्णा बनसोडे सभागृहातील सदस्याच्या प्रश्नातून राज्यातील जनतेला न्याय देतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री शिंदे अभिनंदनपर भाषणात म्हणाले की, विधानसभेच्या उपाध्यक्षपदी सदस्य अण्णा बनसोडे यांच्या निवड प्रक्रियेत सर्वपक्षीय सहकार्याचे वातावरण दिसून आले.

विरोधी पक्षातील नेत्यांनीही सकारात्मक भूमिका घेत बनसोडे यांच्या निवडीला पाठिंबा दर्शवला, याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधी पक्षातील नेत्यांचेही आभार मानले आणि उपाध्यक्षपदी विराजमान झालेल्या अण्णा बनसोडे यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## युवतीला पळवून नेण्याचा तृतीयपंथीयाचा प्रयत्न फसला

कणकवली : नांदगाव येथील युवतीला तृतीयपंथीयाकडून पळवून नेण्याचा प्रयत्न झाला. मात्र, सतर्क नागरिकांकडून पाठलाग करून तृतीयपंथीयाला हुमरठ येथे पकडून युवतीची पोलिसांच्या मदतीने सुटका केली. तर तृतीयपंथीयाच्या दुसऱ्या साथीदाराला ग्रामस्थांनी नांदगाव येथे पकडून ठेवले. ही घटना गुरूवारी (दि.२७) दुपारी १२.४५ च्या सुमारास घडली. यावेळी युवतीवर जादूटोणा केल्याचे उपस्थितांमधून बोलले जात होते. तृतीय पंथीय व्यक्तीने नांदगाव येथे फिरत असताना युवतीला बोलण्यात गुंतवून ठेवले आणि आपल्या मोहिणीच्या जाळ्यात अडकवून त्या युवतीला वाहनातून कणकवलीच्या दिशेने घेऊन गेली. यावेळी त्याने जादूटोणा केल्याचा प्रयत्न केला. त्याला युवतीही प्रतिसाद देऊ लागली.

मात्र, याची स्थानिक ग्रामस्थांना माहिती मिळताच त्यांनी तृतीयपंथीयाला पकडले. तर दुसऱ्या तृतीय पंथीयाला युवतीसह मुंबई – गोवा महामार्गावरील हुमरठ येथे ताब्यात घेतले. तृतीय पंथीयाला कणकवली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर युवतीला रूग्णालयात दाखल केले आहे. अधिक तपास कणकवली पोलीस करीत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**